Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844655

# जनादेश ते वैयक्तिक निवड: भारतीय कुटुंब संस्थेचे मानसशास्त्रीय संक्रमण

प्रो.डॉ.शेषराव राठोड[1] & प्रो.डॉ.रेवणनाथ काळे[2]

**गोषवारा:**

भारतीय इतिहासात संयुक्त कुटुंब हे केवळ राहण्याचे ठिकाण नव्हते,तर ती एक 'सामाजिक विमा' व्यवस्था होती. जिथे अनाथ,विधवा आणि वृद्धांना आपोआप संरक्षण मिळत असे.वर्तमान भारतीय कुटुंब व्यवस्थेचा प्रवास केवळ संयुक्त कुटुंब ते विभक्त कुटुंब असा नाही तर विभक्त कुटुंबातही विविध आणि जटील उप-प्रकार विकसित होत आहेत. हा बदल पारंपारिक संयुक्त कुटुंब ते मुले नसलेले दुहेरी-उत्पन्न कुटुंब,समलिंगी कुटुंब आणि सावत्र कुटुंबासारख्या आधुनिक संरचानाकडे झालेला दिसून येतो. या विघटनाला केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि मानसिक कारणेही जबाबदार आहेत. आज भारतीय कुटुंब धार्मिक कर्तव्यांनी परिभाषित प्रत्येकाने मुल जन्माला घालावेच या पारंपारिक"जनादेश" पासुन आज उच्च शिक्षित नोकरदार कुटुंब मुल जन्माला न घालण्याच्या दिशेने जात आहे.आज महिला आणि पुरुष दोघेही पाहिल्या जोडीदारापासून मुल असल्यानंतरही पुनर्विवाह करुण नवीन कुटुंबाची निर्मिती करत आहेत.LGBTQIA+ आणि DINK कुटुंबे कुटुंबाच्या पारंपारिक परिभाषांना छेद देत,जैविक किंवा कायदेशीर संबंधांपेक्षा भावनिक बंध आणि वचनबद्धतेवर भर देतात.DINKsने,"वारसा" म्हणजे केवळ मुल जन्माला घालणे एवढेच नाही तर ते यशस्वी करिअर आणि जपलेले नातेसंबंध या स्वरूपात देखील असू शकतो तसेच "संयुक्तता" एकाच छताऐवजी भावनिक आणि आर्थिक परस्परावलंबनाने वाढवता येते हे परिभाषित केले आहे.

**मुख्यशब्द:** DINK, LGBTQIA+,सावत्रकुटुंब,सामाजिक विमा,निवडलेले कुटुंब,

**संशोधन समस्या:** कुटुंबसंस्था मानवाच्या जीवनाला आकार देणारी,त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणारी आणि त्याला भावनिक,आर्थिक सुरक्षा उपलब्ध करून देणारी महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. ही सामाजिक संस्था स्थळ आणि काळानुरूप बदलत असते. यामुळे औद्योगीकरणाच्या अगोदर असणारी संयुक्त कुटुंब पद्धती आज विभक्त कुटुंब आणि त्याच्या उप-प्रकारामाध्ये विकसित होत आहे.या नव्याने उदयाला येत असलेल्या कुटुंब प्रकाराचे व्यक्ती,कुटुंब आणि एकूण समाज व्यवस्थेवर जे अनुकूल वा प्रतिकूल प्रभाव पडत आहेत याचा वेध घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधन लेखात केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये:** सदरील संशोधन लेख लिहिण्याचा प्रमुख उद्देश भारतीय कुटुंब संस्थेत होणाऱ्या बदलाचा शोध घेणे हा आहे.

[1] प्रमुख, समाजशास्त्र विभाग व संशोधन केंद्र, विनायकराव पाटील महाविद्यालय वैजापूर, जि .छत्रपती संभाजीनगर (महा.)
[2] प्रमुख, समाजशास्त्र विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय गेवराई, जि .छत्रपती संभाजीनगर (महा.)

**साहित्य आणि पद्धत:** प्रस्तुत संशोधन लेखा दुय्यम तथ्य सामग्रीवर आधारित असून यासाठी पुस्तके, प्रकाशित लेख, इंटरनेटवरील साहित्य इत्यादीचा आधार घेतला आहे.

**सैद्धांतिक चौकट:**

“पार्सन्सच्यामते, कुटुंबाची संरचना ही त्या समाजाच्या गरजानुसार विकसित होत असते. औद्योगीकरणाच्या अगोदर समाजामध्ये संयुक्त कुटुंब व्यवस्था ही प्रामुख्याने दिसून येत होती कारण या काळात शेती आणि कुटीर उद्योग करण्यासाठी एकापेक्षा अधिक कामगारांची गरज होती. त्या काळात जाती व्यवस्था प्रभावी होती म्हणून प्रत्येक जातीला आपला नेमून दिलेल्या व्यवसाय करावा लागत असे.म्हणून संयुक्त कुटुंब व्यवस्था प्रामुख्याने आढळून येत होती. परंतु औद्योगीकरणानंतर लघु आणि कुटीर उद्योगाचा ऱ्हास झाला आणि बेकार झालेले रोग लोक रोजगारासाठी महानगरांमध्ये स्थलांतरित झाले आणि यामुळे संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंब किंवा न्यूक्लिअर कुटुंबाचा उदय झाला म्हणून पार्सन्सचा असा तर्क आहे की प्रत्येक काळातील कुटुंबाची संरचना ही त्या समाजाच्या गरजेला अनुसरून विकसित होत असते.” [१]

**प्रस्तावना:** पारंपारिक भारतीय कृषीप्रधान समाजात संयुक्त कुटुंब व्यवस्था ज्यात बहु-पिढ्यांचे लोक एकत्र राहत होते ती एक अनौपचारिक "सामाजिक विमा कंपनी" म्हणून कार्यरत होती. येथे अनाथ,विधवा आणि वृद्धांना आपोआप संरक्षण मिळत असे. हे संयुक्त कुटुंब उत्पादन आणि उपभोगाचे एक सामुहिक एकक म्हणून कार्यरत होते. येथे "प्रत्येकाकडून त्याच्या क्षमतेनुसार काम करुन घेतले जाई आणि प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार मोबदला मिळत असे."उर्वरित उत्पन्न सामूहिक निधीमध्ये जमा होत असे.इरावती कर्वेच्यामते,“संयुक्त कुटुंब म्हणजे अशा लोकांचा समूह जो सामान्यतः एकाच छताखाली राहतो, एकाच चुलीवर शिजवलेले अन्न खातो, सामूहिक मालमत्ता धारण करतो, सामूहिक उपासनेत सहभागी होतो आणि एका विशिष्ट प्रकारच्या नात्याप्रमाणे संबंधित असतो”[२]

**१. प्राचीन आदेश: पालकत्व एक पवित्र कर्तव्य म्हणून**

भारतीय सांस्कृतिचा अभ्यास करणारा "ग्रंथीय दृष्टिकोण" कुटुंबाची कल्पना श्रेणीबद्ध, पितृसत्ताक आणि कर्तव्यबद्ध एकक म्हणून करतो. वेद, धर्मशास्त्र आणि मनुस्मृतीपासून घेतलेले, हे मॉडेल व्यक्तीला अपत्य जन्माला घालण्याचे स्वातंत्र्य बहाल करत नव्हते तर ते काम धार्मिक आणि सामाजिक दायित्वांच्या भावनेतून प्रत्येकाने करणे गरजेचे आहे असेच मानीत होते. या चौकटीत पालकत्व कधीही जीवनशैलीचा पर्याय नव्हता; ती एक वैश्विक आणि सामाजिक आवश्यकता होती. "पारंपारिक भारतीय मानसिकतेत, मुलांना 'देवाची देणगी' मानले जात होते.विशेषतः विवाहाचा प्राथमिक उद्देश लैंगिक गरज भागवणे आणि संततीद्वारे वंश परंपरा चालू ठेवणे हाच होता. पालकत्वाकडे एक जनादेश म्हणून पाहिले जात असे, निवड म्हणून नाही." दाम्पत्याला मूल नसणे हे केवळ वैयक्ती दुःख नव्हते तर ते एक सामाजिक अपयश होते.लग्नानंतर २-३ वर्षांच्या आत गर्भधारणा झाली नाही तर अशा जोडप्याला "अपूर्ण" किंवा"अपयशी"मानले जात असे. धार्मिक विधी आणि शुभ सामाजिक समारंभांपासून यांना दूर ठेवले जाई. बरेचदा मुल न होणे हे घटस्फोटासाठी प्रमुख कारण मानले जाई आणि पुरुषांना वारस मिळवण्यासाठी अनेक विवाह करण्यास सामाजिक अधिकार मिळत असे.

हिंदू धर्मात प्रत्येक व्यक्तीवर तीन मुख्य (देवऋण,पितृऋण,ऋषीऋण)ऋण असतात,आणि त्यातून मुक्त होण्यासाठी पंच(ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ,पितृयज्ञ,भूतयज्ञ आणि मनुष्ययज्ञ/अतिथी यज्ञ) महायज्ञ सांगितले आहेत.कारण त्याशिवाय व्यक्तीला मोक्ष मिळणार नाही.आणि हे करण्यासाठी मुलगा हवा असा एक अलिखित नियमच होता.या कठोर ऐतिहासिक अपेक्षांनी शतकानुशतके भारतीय लोकांच्या जीवनावर राज्य केले,परंतु आज भारतीय लोकांच्या मुल हवेच या मानसिकतेत अमुलाग्र बदल घडून आले आहे.

**२. (DINKडिंक): दुप्पट उत्पन्न, मुले नाहीत":**

आज दुप्पट उत्पन्न आणि मूल नसलेल्या कुटुंबाच्या संख्येत वाढ होत आहे. कारण उच्च पदस्थ नोकरदार पती-पत्नी मूल न जन्माला घालण्याचा निर्णय सहमतीने घेत आहेत. वाढती महागाई, मूल सांभाळण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसणे वा मूल जन्माला घालण्यासाठी असमर्थ असणे यापैकी कोणतेही कारण कारणीभूत असेल.अशा कुटुंबामध्ये पती-पत्नी आणि एखादा पाळीव कुत्रा हा त्यांच्या कुटुंब सभासद म्हणून असू शकतो. म्हणून या कुटुंबाला दुप्पट उत्पन्न असणारे परंतु अपत्य नसणारे कुटुंब म्हणून त्याचा उल्लेख केला जातो.

मूल मुक्त राहण्याचा निर्णय घेणारे हे आधुनिक जोडपे पारंपारिक भारतीय पालकांच्या वैयक्तिक त्याग या दृष्टिकोनाकडे दुर्लक्ष करून स्वतःला अधिकाधिक वेळ देण्यासाठी तसेच मुलामुळे होणारी सततची झोपमोड आणि शारीरिक थकवा,मुल झाल्यानंतर तीन वर्षांच्या आत वैवाहिक आनंदात होणारी "महत्त्वपूर्ण घट" आणि घरगुती काम आणि पालकत्वाच्या जबाबदाऱ्यांतून होणारे दैनंदिन संघर्ष,ताण आणि चिंता कमी करणे तसेच आपले छंद जोपासणे शक्य व्हावे यासाठी हे नोकरदार जोडपे मुल जन्माला न घालण्याचा निर्णय घेत आहेत.

वृद्धापकाळाच्या आधारासाठी हे जोडपे स्थावर आणि जंगम (सोने, प्लॅटिनम) मालमत्ता यामध्ये गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. ते उच्च दर्जाच्या महागड्या गाड्याचा वापर, विदेशी पर्यटन याला प्राधान्य देतात. आज भारतीय अर्थव्यवस्थेत DINKs "सुपर कंझ्युमर" म्हणून उदयास आले आहेत. DINK,जोडपे त्यांचे भांडवल मास्लोच्या गरजाच्या सिद्धांतानुसार स्व-विकासाद्वारे "सर्वोच्च समाधान पातळी" गाठण्याचा प्रयत्न करतात.

या संक्रमणात अंतर्निहित लिंगानुसार दुहेरी मानक देखील आपण मान्य केले पाहिजे. मूल नसलेल्या पुरुषांना वंश आणि वारसा याबद्दल गोंधळाचा सामना करावा लागू शकतो, बहुतेकदा त्यांना "दया" आणि गर्भधारणेच्या त्यांच्या शारीरिक "क्षमतेबद्दल" प्रश्न विचारले जातात, जरी निवड पूर्णपणे ऐच्छिक असली तरीही.

**३.सावत्र (मिश्र) कुटुंब:** हा कुटुंबाचा असा प्रकार आहे जेथे कमीत कमी एका जोडीदाराला किंवा काहीवेळा दोघांनाही मागील नात्यातील मुल असते आणि ते दोघे एकत्र येऊन एका नवीन कुटुंबाची स्थापना करतात. या कुटुंबांना, ज्यांना "बोनस"[3] कुटुंबे म्हणतात. घटस्फोट, वेगळे होणे किंवा जोडीदाराच्या मृत्यूनंतर कुटुंबाच्या पुनर्रचनेमुळे मिश्र कुटुंबे किंवा सावत्र कुटुंबे प्रामुख्याने निर्माण होतात. जेव्हा पूर्वीच्या नात्यांमधून मुले असलेल्या व्यक्ती विवाह किंवा सहवासाद्वारे एकत्र येतात तेव्हा सावत्र कुटुंबाची निर्मिती होते. त्यात सावत्र भावंडे आणि सध्याच्या नात्यातील जैविक मुले असू शकतात.या कुटुंबात मुलांना निष्ठा संघर्ष, चिंता किंवा दुःखाचा अनुभव येऊ शकतो.वेगवेगळ्या दिनचर्यांशी जुळवून घेणे आणि माजी जोडीदारांशी संबंध सुधारणे समाविष्ट आहे.

४. **समलैंगिक कुटुंब (LGBTQIA+):** सन २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने घटनेच्या कलम (३७७) केलेला बदल तसेच २०२४ मध्ये वयाची १८ वर्ष पूर्ण केलेल्या व्यक्तीने सहमतीने समलैंगिक संबंध ठेवणे गुन्हा नाही असे म्हंटले आहे. तेंव्हा पासून आपल्या देशात अशा कुटुंबाची निर्मिती होत आहे. याकुटुंबाची निर्मिती लेस्बियन,गे,बायसेक्शुअल,ट्रान्सजेंडर, क्वियर, इंटरसेक्स,अलैंगिक किंवा इतर ओळखी असलेल्या व्यक्ती एकत्र येऊन करतात.याकुटुंबातील लोक अपत्य प्राप्तीसाठी दत्तक, पुनरुत्पादक तंत्रज्ञानाचा आधार घेतात किंवा "निवडलेले कुटुंब" याचा आधार घेतात. जेंव्हा LGBTQIA+परिवारातील व्यक्तींना जैविक कुटुंब स्वीकारीत नाही;तेव्हा त्या व्यक्ती भावनिक आधारासाठी "कायदेशीर मान्यता असो वा नसो,परस्पर समर्थन आणि प्रेमाच्या उद्देशाने जाणीवपूर्वक गैर-जैविक

नातेसंबंध जोपासतात तेंव्हा त्याला निवडलेले कुटुंब असे म्हणतात".[४] थोडक्यात,निवडलेले कुटुंब म्हणजे असे कुटुंब जे रक्तसंबंध किंवा कायदेशीर नात्यांवर आधारित नसते,पण प्रेम,आधार,विश्वास आणि जिव्हाळ्यामुळे आपण त्यांना आपले कुटुंब मानतो.

**सारांश:** भारतीय कुटुंबाचा प्रत्येक व्यक्तीला मोक्ष प्राप्त करण्यासाठी मुल हवेच या पवित्र आदेशापासून मुल जन्माला घालणे ही प्रत्येकाची वैयक्तिक निवड आहे या दिसेन झालेला बदल हा २१ व्या शतकातील लोकसंख्याशास्त्रीय तथ्य आहे. आज भारतीय कुटुंब धार्मिक कर्तव्यांनी परिभाषित केलेल्या प्रत्येकाने मुल जन्माला घालावेच या पारंपारिक"जनादेश" पासुन वाटाघाटी करुण मुल जन्माला न घालण्याच्या दिशेने जात आहे.DINKs कुटुंब वृद्धत्वासाठीची तरतूद म्हणून आर्थिक बच्चत आणि 'निवडलेले कुटुंब' हे नवीन मॉडेल्स विकसित करित आहे. DINKs हे सिद्ध करण्याचा प्रयत्न आहे की "वारसा" म्हणजे केवळ मुल जन्माला घालणे एवढेच नाही तर ते यशस्वी करिअर आणि जपलेले नातेसंबंध या स्वरूपात देखील असू शकतो. DINKs ने"संयुक्तता"एकाच भौतिक छताऐवजी भावनिक आणि आर्थिक परस्परावलंबनाने वाढवता येते हे परिभाषित केले आहे.

भारतीय समाजात रूढ पुनर्विवाह प्रकार म्हणजे फक्त मुले असलेल्या पुरुषांनीच केलेला पुनर्विवाह होय, पण आज महिला आणि पुरुष दोघेही पाहिल्या जोडीदारापासून मुल असल्यानंतरही पुनर्विवाह करुण नवीन कुटुंबाची निर्मिती करत आहेत. LGBTQIA+ आणि DINK कुटुंबे कुटुंबाच्या पारंपारिक परिभाषांना छेद देत, जैविक किंवा कायदेशीर संबंधांपेक्षा भावनिक बंध आणि वचनबद्धतेवर भर देतात. ते सुट्ट्या घालवणे आणि आणीबाणीसाठी भावनिक आधार देणारे "निवडलेले कुटुंब" तयार करण्यासाठी मैत्री आणि इतर नातेसंबंधामध्ये खोलवर गुंतवणूक करत आहेत.

**संदर्भ:**


1. https://thesociologyguy.com/talcott-parsons-and-the-famil
2. https://www.sociologydiscussion.com/family/joint-family-culture-in-india-
3. https://www.google.com/search?q=+blended+family
4. https://www.charliehealth.com/


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*